# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक १३.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ६३ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन
४२,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १२/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण ०५ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये
जुगार खेळवणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१२/०८/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य व नगदी रू. असा एकुण ६,८२०/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.११/०८/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयातील पोलीस स्टेशन कुरूंदा ०१ व पोस्टे हिंगोली ग्रा.०१,हटटा ०१ असे एकुण ०३ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २०.५२ लिटर दारू असा एकुण ९,२४०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**चोरी:—** दिनांक १२/०८/२०२२ रोजी फिर्यादी मधुकर रमेश गायकवाड व्य.खाजगी नौकरी रा. शिवराम नगर परभणी यांचे फिर्यादी वरून पोस्टे कुरूंदा येथे कलम ३७९,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१२.०८.२२ रोजी चे ०३:०३ वा चे पुर्वी वाई शिवार व भेडेगाव शिवार येथे यातील आरोपीतांनी संगणमत करून मोबाईल टावरच्या ५ वॅटच्या कि.२५,००० रू व भेडेगाव शिवारातील टावरचे ७० लिटर डिझेल आसा एकुण ३१,५०० रू मुद्देमाल चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात कुरूंदा पोलीस तपास करित आहेत.